दैनिक
# महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990

लातूर  वर्ष ३ रे  अंक ३०६ वा  शुक्रवार दि.१७ मे २०२४  पृष्ठे ४  स्वागत मूल्य २ रू.








# रायबरेलीत सोनिया गांधी सक्रिय

रायबरेली : सध्या लोकसभा निवडणुकीची धामधूम सुरु आहे. काँग्रेसच्या गांधी-नेहरू घराण्याची परंपरागत जागा मानल्या जाणा-या रायबरेलीमध्ये पुन्हा एकदा गांधी कुटुंब एकत्र येणार आहे. राहुल गांधी, प्रियंका गांधी आणि सोनिया गांधी शुक्रवारी रायबरेलीमध्ये एका विशाल जनसभेला संबोधित करणार आहेत.या जाहीर सभेला समाजवादी पक्षाचे प्रमुख अखिलेश यादवही उपस्थित राहणार आहेत. मात्र, या मतदारसंघातून दोन दशके खासदार राहिलेल्या सोनिया गांधी या जाहीर सभेपूर्वीच रायबरेलीत सक्रिय झाल्या आहेत. दोन दिवसांच्या दौ-यावर त्या रायबरेलीला पोहोचल्या आहेत. दौ-याच्या पहिल्या दिवशी म्हणजेच आज सोनिया गांधी भुएमऊ येथे कार्यकर्त्यांची बैठक घेणार आहेत. यानंतर उद्या म्हणजेच शुक्रवारी त्या एका मोठ्या जाहीर सभेत सहभागी होणार आहे. शुक्रवारी दुपारी एक वाजता आयटीआय मैदानावर ही जाहीर सभा होणार आहे.रायबरेली लोकसभा मतदारसंघ हा गांधी कुटुंबीयांचा बालेकिल्ला आहे. या जागेवरून निवडणूक जिंकून गांधी कुटुंबीयांतील अनेक सदस्य संसदेत पोहोचले आहेत. २००४ ते २०२४ या काळात सोनिया गांधी यांनी रायबरेलीचे प्रतिनिधित्व केले आहे. २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत सुद्धा काँग्रेसला रायबरेलीची जागा मिळाली होती. मात्र, यंदाच्या निवडणुकीत सोनिया गांधी रायबरेली मतदारसंघातून निवडणूक लढवत नाहीत.३दरम्यान, रायबरेली मतदारसंघातून काँग्रेसने राहुल गांधींना उमेदवारी दिली आहे. तर भाजपाने दिनेश प्रताप सिंह यांना उमेदवारी दिली आहे. रायबरेलीमध्ये पाचव्या टप्प्यासाठी २० मे रोजी मतदान होणार आहे. उत्तर प्रदेशात सपा आणि काँग्रेसमध्ये आघाडी आहे. हे दोन्ही पक्ष इंडिया आघाडीचा भाग आहेत.

# तुम्ही तर रक्ताचे होतात, मग तरीही का सोडून गेलात?

नाशिक : लोकसभा निवडणुकीच्या प्रचारादरम्यान महायुती विरुद्ध महाविकास आघाडी असा सामना रंगत आहे. दोन्ही बाजूच्या नेत्यांकडून एकमेकांवर आरोप-प्रत्यारोप केले जात आहे. मात्र आता महायुतीच्या दोन नेत्यांमध्येही राजकीय कलगीतुरा रंगला असून मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी केलेल्या टीकेला उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादीचे नेते आणि मंत्री छगन भुजबळ यांनीही जोरदार प्रत्युत्तर दिले आहे.

बाळासाहेबांना सोडून जाणा-या छगन भुजबळ यांच्या मांडीला मांडी लावून तुम्ही कसे बसला होता, असा सवाल एका सभेतून राज ठाकरे यांनी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख आणि राज्याचे माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना विचारला होता. राज यांच्या या वक्तव्यावर बोलताना भुजबळ म्हणाले की हा प्रश्न राज ठाकरे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनाही विचारला पाहिजे की, ही बाळासाहेब ठाकरे यांची शिवसेना आहे असे तुम्ही म्हणता. मग तरीही तुम्ही भुजबळांच्या मांडीला मांडी लावून कसे काय बसला आहात? माझ्याबद्दल ही सगळी मंडळी बोलतात, पण मी तरी एक शिवसैनिक असेल, कदाचित फार कट्टर नाही, असेही समजून चला. अरे पण तुम्ही तर रक्ताचे आहात ना? असा खोचक सवाल भुजबळांनी विचारला आहे.



पुढे बोलताना छगन भुजबळ यांनी म्हटले आहे की, राज शाळेतून आला नाही, म्हणून अनेकदा मातोश्रीवरील लोक जेवत नव्हते. असे असताना तुम्ही का केले असे बाळासाहेबांसोबत? तुम्ही तर इकडे पण असता तिकडे पण असता. चला जाऊ द्या, माझ्यादृष्टीने हा मुद्दा संपला आहे, कारण लोकांनाही हा मुद्दा फारसा भावला असे काही नाही. मी जसं उद्धव ठाकरे यांच्यासोबत बसलो होतो, तसं आता एकनाथ शिंदे यांच्याबरोबरही बसलो आहे, अशा शब्दांत भुजबळ यांनी आपली भूमिका मांडली. दरम्यान, छगन भुजबळ यांनी दिलेल्या या उत्तरानंतर राज ठाकरे यांच्याकडून त्यावर काही भाष्य केले जाते का, हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

# मी स्वाती मालीवाल यांच्या पाठिशी

नवी दिल्ली : आम आदमी पक्षाच्या खासदार स्वाती मालिवाल यांना दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्या निवासस्थानी झालेल्या कथित मारहाणीचे प्रकरण सध्या चर्चेत आहे. तसेच या मुद्यावरून आम आदमी पक्षाची कोंडी झाली आहे. या प्रकरणी अरविंद केजरीवाल यांचे निकटवर्तीय असलेल्या विभव कुमार यांच्यावर आरोप झाले असून राष्ट्रीय महिला आयोगाने या प्रकरणी समन्स पाठवले आहे. दरम्यान, अनेक महिला नेत्या स्वाती मालिवाल यांना पाठिंबा देत आहेत. आता काँग्रेसच्या नेत्या प्रियंका गांधी यांनीही या प्रकरणी आपली भूमिका स्पष्ट केली आहे.या प्रकरणी प्रियंका गांधी यांच्याकडे विचारणा करण्यात आली असता त्यांनी सांगितले की, सध्या मी उत्तर प्रदेशमध्ये असल्याने याबाबत मी अधिक काही पाहिलेले नाही. मात्र कुठल्याही महिलेसोबत काही अत्याचार झाला असेल तर मी त्या महिलेच्या बाजूने बोलेन. मी त्या महिलेच्या



बाजूने उभी राहीन. मात्र भाजपा नेते याबाबत काय बोलू शकतात? भाजपाने हाथरस प्रकरणी काहीही केलेले नाही. उन्नाव प्रकरणी काहीही केलेले नाही. भाजपाने महिला कुस्तीपटूंबाबतही काहीही केलेले नाही.

जर खरोखरच काही चुकीचे घडलले असेल, तर मी त्या महिलेसोबत उभी राहीन. जर स्वाती मालिवाल यांना माझ्याशी बोलायचे असेल तर मी त्यांच्यासोबत बोलेन. जर अरविंद केजरीवाल यांना या बाबत काही माहिती असेल तर ते योग्य कारवाई करतील, अशी मला अपेक्षा आहे. यातून अरविंद केजरीवाल स्वाती मालिवाल यांना मान्य होईल असा काही तोडगा काढतील अशी मला अपेक्षा आहे. मी नेहमी कुठल्याही प्रकारच्या अत्याचाराविरोधात बोलत आले आहे. आता या प्रकरणामध्येही जी कारवाई करण्याची आवश्यकता असेल ती केली गेली पाहिजे असेही प्रियंका गांधी म्हणाल्या.

# मतमोजणीसाठी नियुक्त अधिकारी, कर्मचाऱ्यांनी आपली जबाबदारी अचूकपणे पार पाडावी

## जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे मतमोजणी पूर्वतयारीच्या नियोजनाचा आढावा

लातूर :- लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ करिता लातूर लोकसभा मतदारसंघात ७ मे रोजी मतदान झाले असून शहरातील शासकीय महिला निवासी तंत्रनिकेतन येथे ४ जून २०२४ रोजी मतमोजणी होणार आहे. यासाठी विविध पथके गठीत करण्यात आली असून प्रत्येक पथकातील अधिकारी, कर्मचारी यांनी आपली जबाबदारी अचूकपणे पार पाडावी, अशा सूचना जिल्हाधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात बुधवारी झालेल्या बैठकीत दिल्या. प्रभारी अपर जिल्हाधिकारी तथा उपजिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. भारत कदम, निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके, उपजिल्हाधिकारी नितीन वाघमारे, अहिल्या गाठाळ, लातूरच्या उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे-विरोळे, जिल्हा कोषागार अधिकारी उज्ज्वला पाटील, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालक कल्पना क्षीरसागर, नगरपालिका प्रशासनचे जिल्हा सहआयुक्त रामदास कोकरे, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी आशुतोष बारकुल, जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी जावेद शेख, जिल्हा उद्योग केंद्राचे प्रकल्प संचालक प्रवीण खडके, तहसीलदार सौदागर तांदळे यावेळी उपस्थित होते.




मतमोजणी प्रक्रिया सुरळीत आणि अचूकपणे पार पाडण्यासाठी विविध पथके गठीत करण्यात आली आहेत. या पथकांमध्ये नियुक्त अधिकाऱ्यांनी आपल्यावर सोपविलेल्या जबाबदारीच्या अनुषंगाने भारत निवडणूक आयोगाने निर्गमित केलेल्या नियमांचा अभ्यास करून त्यादृष्टीने पूर्वतयारी करावी. मतमोजणी दिवशी कोणत्याही प्रकारे चूक होवू नये, यासाठी आतापासूनच खबरदारी घेणे आवश्यक आहे. मतमोजणी कक्षातील बैठक व्यवस्था, मतमोजणीसाठीचे टेबल, ध्वनिक्षेपक यंत्रणा आदी सर्व सुविधा उपलब्ध करून देण्याची कार्यवाही विहित कालावधीत पूर्ण करावी, अशा सूचना जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांनी दिल्या. प्रारंभी उपजिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. कदम, निवडणूक विभागातील नायब तहसीलदार पंकज मंदाडे यांनी मतमोजणीसाठी जिल्हास्तरावर गठीत विविध पथकांची आणि त्यांच्यावर सोपविण्यात आलेल्या जबाबदारीची माहिती दिली.

# लवकरच पीओके भारतात येणार

नवी दिल्ली : केंद्रीय गृहमंत्री अमित शाह आणि संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांच्यानंतर आता परराष्ट्र मंत्री एस जयशंकर यांनीही पाकव्याप्त काश्मीरबाबत मोठे वक्तव्य केले आहे. पाकव्याप्त काश्मीर भारताचा अविभाज्य भाग आहे आणि अखेरीस तो भारतात परत येईल. तेथील जनता आता त्यांच्याच सरकारच्या विरोधात रस्त्यावर उतरली आहे असे जयशंकर म्हणाले.नाशिकमध्ये आयोजित कार्यक्रमात पीओकेमधील वाढत्या हिंसाचाराबाबत बोलताना जयशंकर म्हणाले की, जम्मू आणि काश्मीरमध्ये गेल्या काही वर्षांत मोठ्या प्रमाणावर होत असलेला विकास पाहून पीओकेचे लोक भारताकडे आकर्षित झाले आहेत. ते इकडचा



सकारात्मक बदल पाहून स्वत:ला प्रश्न विचारत आहेत की, या गोष्टी ख-या आहेत, तर आम्हाला इकडे इतका त्रास का होत आहे? आम्ही असा अत्याचार का स्वीकारत आहोत? लोक हिंसाचाराला कंटाळले आहेत

परराष्ट्र मंत्री पुढे म्हणाले की, पीओकेच्या मुझफ्फराबादमध्ये संपूर्ण अराजकता पसरली आहे, स्थानिक लोक हिंसाचाराला कंटाळले आहेत. वाढती महागाई आणि वाढलेल्या वीजबिलामुळे अनेक दिवसांपासून परिसर अशांत आहे. पीओके एक वेगळी श्रेणी असली तरी, तो शेवटी भारताचा भाग आहे आणि भारतात परत येईल, याबद्दल आमच्या मनात शंका नाही, असेही ते यावेळी म्हणाले.

# गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार अभियान शिरूर अनंतपाळ तालुक्यातील गाळ उपसा कामांची जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी केली पाहणी

## घरणी प्रकल्पातील ६ लाख घनमीटर गाळाचा लोकसहभागातून उपसा

लातूर :- जिल्ह्यात गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार अभियान राबविण्यात येत असून या अंतर्गत शिरूर अनंतपाळ तालुक्याती घरणी मध्यम प्रकल्प आणि उमरगा लघु पाटबंधारे तलावातील गाळ उपसा करण्यात येत आहे. जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी या प्रकल्पांना भेट देवून तेथील कामाची पाहणी केली. या कामामुळे शेतजमीन सुपीक बनण्यासोबतच प्रकल्पाची साठवण क्षमता वाढण्यासाठीही मदत होणार असल्याचे जिल्हाधिकारी यावेळी म्हणाल्या. लघु पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता रोहित जगताप, जिल्हा जलसंधारण अधिकारी अनिल कांबळे, निलंगाचे उपविभागीय अधिकारी शरद झाडके, चाकूरचे तहसीलदार नरसिंग जाधव, शिरूर अनंतपाळचे तहसीलदार गोविंद पेदेवाड यांच्यासह शेतकरी यावेळी उपस्थित होते.



गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार अभियान अंतर्गत घरणी मध्यम प्रकल्पातून ८ ते ९ गावातील शेतकऱ्यांनी लोक सहभागातून गाळाचा उपसा केला आहे. सुमारे ६ लाख १० हजार घनमीटर गाळ उपसा करून शेतकऱ्यांनी स्वखर्चाने आपल्या शेतात नेवून टाकला आहे. यामुळे प्रकल्पाच्या साठवण क्षमतेत अंदाजे ६ कोटी लिटरणे वाढ होणार आहे. तसेच उमरदरा लघु पाटबंधारे तलावातून ३२ हजार घनमीटर गाळाचा उपसा झाला असून जवळपास ४६ शेतकऱ्यांनी हा गाळ आपल्या शेतात टाकल्याने जमिनीतील सुपीकता वाढणार आहे. यासोबतच प्रकल्पाच्या साठवण क्षमतेत ३२ लाख लिटरने वाढ होणार असल्याचे लघु पाटबंधारे आणि जलसंधारण विभागाच्या अधिकाऱ्यांनी यावेळी सांगितले.

सिंचन प्रकल्पातील गाळ उपसा करून शेतात टाकल्यामुळे शेतकऱ्यांना दुहेरी फायदा होईल. या गाळामुळे जमिनीची सुपीकता वाढण्यास मदत होणार आहे, तसेच प्रकल्पाची साठवण क्षमता वाढल्याने या वाढीव पाणीसाठ्याचा सिंचनासाठीही लाभ होईल. त्यामुळे शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ होण्यास मदत होईल, असा विश्वास जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी यावेळी व्यक्त केला. जिल्ह्यातील जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी या अभियानात सहभागी व्हावे. गाळ उपसा करण्यात आलेल्या प्रकल्पांच्या सभोवतील लोक सहभागातून वृक्षारोपण करण्यात यावे. तसेच शेतकऱ्यांनीही आपल्या शेताच्या बांधावर फळझाडे लावून वृक्षारोपण मोहिमेत सहभागी होणायचे आवाहनही जिल्हाधिकारी यांनी यावेळी केले.

# 'गो-ग्रीन'द्वारे वीजग्राहकांची वीस लाख रुपयांची वार्षिक बचत

लातूर : प्रतिनिधी महावितरणच्या 'गो-ग्रीन' योजनेअंतर्गत वीजबिलांसाठी छापील कागदाचा वापर पूर्णपणे बंद करीत केवळ 'ई-मेल' व 'एसएमएस'चा पर्याय निवडणा-या लातूर परिमंडलातील पर्यावरणस्नेही १६ हजार ४७९ ग्राहकांकडून १९ लाख ७७ हजार ४८० रुपयांची वार्षिक बचत सुरू आहे. वीजग्राहकांनी 'गो-ग्रीन'चा पर्याय निवडून पर्यावरणस्नेही व्हावे, असे आवाहन मुख्य अभियंता सुंदर लटपटे यांनी केले आहे.महावितरणच्या 'गो-ग्रीन' योजनेनुसार वीजग्राहकांनी छापील वीजबिलाच्या कागदाऐवजी फक्त 'ई-मेल' व 'एसएमएस'चा पर्याय निवडल्यास प्रतिबिलात १० रुपये सवलत देण्यात येत आहे. त्यामुळे योजनेत सहभागी ग्राहकांची वीजबिलांमध्ये वार्षिक १२० रुपयांची बचत होत आहे. वीजबिल तयार झाल्यानंतर लगेचच संगणकीय प्रणालीद्वारे ते 'गो-ग्रीन' मधील ग्राहकांना 'ई-मेल'द्वारे पाठविण्यात येत आहे. सोबतच 'एसएमएस'द्वारे देखील वीजबिलाची माहिती देण्यात येत आहे. त्यामुळे वीजग्राहकांना 'प्रॉम्प्ट पेमेंट'चा लाभ घेणे अधिक शक्य झाले आहे. गो-ग्रीन योजना ही काळाची गरज आहे. वीजग्राहकांनी या योजनेत सहभागी व्हावे व पर्यावरण रक्षणात योगदान द्यावे, असे आवाहन महावितरणने केले आहे. लातूर परिमंडलांतर्गत येणा-या बीड मंडलातील ५ हजार ४८४ वीजग्राहक 'गो-ग्रीन'मध्ये सहभागी झाले आहेत. तसेच धाराशिव मंडलातील ३ हजार ७७७ वीजग्राहकांनी 'गो-ग्रीन'मध्ये सहभाग घेतला आहे. या योजनेत सर्वाधिक सहभाग हा लातूर मंडलात असून ७ हजार २१८ ग्राहकांनी 'गो-ग्रीन' योजनेचा लाभ घेतला आहे.

## संपादकीय....

# ‘मोदी की गॅरंटी’ म्हणजे ‘सरकारी’ गॅरंटी!

गॅरंटी या शब्दातच एक प्रकारचा विश्वास अपेक्षित आहे. पण गेल्या दहा वर्षांत भाजपने आपल्या कृतीमधूनच लोकांचा विश्वास गमावला आहे. २०२४ च्या लोकसभा निवडणुकांसाठी भाजपच्या जाहीरनाम्यात ‘मोदी की गॅरंटी’ हा कळीचा मुद्दा आहे. त्यानिमित्त पंतप्रधान मोदींनी दिलेल्या वेगवेगळ्या गॅरंटींचे काय झाले याचा ऊहापोह लोकसभेच्या निवडणुकीचे बिगूल वाजताच ‘मोदी की गॅरंटी’ हा भाजपच्या प्रचाराचा केंद्रबिंदू ठरेल, अशी प्रचार यंत्रणा चालविली गेली. गेल्या दहा वर्षांत मोदी यांनी नेमक्या कोणत्या गॅरंटी दिल्या व त्यांचे देशावर काय परिणाम झाले, याचा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आढावा घेणे म्हणूनच योग्य ठरेल.योजना आयोग बरखास्त : भारताच्या आर्थिक प्रगतीमध्ये महत्त्वाचे योगदान देणारा योजना आयोग मोदी यांनी १५ ऑगस्ट, २०१४ रोजी लाल किल्ल्यावरून केलेल्या पहिल्याच भाषणात बरखास्त केला. आर्थिक नियोजनावर विश्वास नसणे व योजना आयोगाशी नेहरूंचे नाव जोडले गेल्यामुळे नेहरूद्वेष ही त्यामागची प्रमुख कारणे होती. केंद्र आणि राज्य यांच्यातील आर्थिक नियोजनाचा प्रमुख दुवा असलेले नियोजन आयोग बरखास्त केल्याने गेल्या १० वर्षांत सर्वांगीण आणि सर्वसमावेशकतेचा अभाव जाणवतो, यातून आर्थिक प्रगतीचे फायदे समाजातील सर्व घटकांपर्यंत पोहोचविण्यात मोदी सरकार असमर्थ ठरले. नोटाबंदी : काळा पैसा बाहेर काढणे व अतिरेक्यांना होणारा वित्तपुरवठा रोखण्यासाठी नोव्हेंबर २०१६ मध्ये मोदी यांनी जवळपास ८४ चलनी नोटा (१४ लाख ८६ हजार रु.) चलनातून रद्द करून अर्थव्यवस्था खिळखिळी करून टाकली. इतका बेजबाबदार आर्थिक निर्णय आतापर्यंत कोणत्याही राष्ट्रप्रमुखाने घेतला नसेल. वैशिष्ट्य म्हणजे, त्यापैकी ९९ टक्के रोख रक्कम लोकांनी पुन्हा बँकेत भरली. याचा अर्थ लोक काळा पैसा रोखेत ठेवत नाहीत, इतका विवेकसुद्धा मोदी यांनी दाखवला नाही. भ्रष्टाचार निर्मूलन, दहशतवाद निर्मूलन या दोन्हींपैकी एकही उद्दिष्ट साध्य झाले तर नाहीच, परंतु अर्थव्यवस्था मात्र दोन वर्षे गतप्राण झाली. लाखो लोकांचा रोजगार बुडाला. अर्थव्यवस्थेमध्ये ७२ रोजगार निर्माण करणाऱ्या लघु आणि मध्यम उद्योगाचे कंबरडे मोडले.जीएसटीला हरताळ : अप्रत्यक्ष कररचनेत आमूलाग्र बदल करणारे ऐतिहासिक विधेयक २००९ मध्ये यूपीए सरकारने प्रथम संसदेत मांडले. मुख्यमंत्री म्हणून मोदींनी स्वत: त्याला आठ वर्षे विरोध केला. शेवटी, संसदेचे विशेष अधिवेशन भरवून मोदी सरकारने विकृत स्वरूपात ते मंजूर करून घेतले. सबंध देशभर एकच जीएसटी कर करण्याऐवजी भारतात त्याचे पाच स्लॅब करून मोदी सरकारने त्याच्या मूळ उद्देशालाच हरताळ फासला. दोन वर्षांनंतर पेट्रोल व डिझेल जीएसटीमध्ये आणण्याची काँग्रेसची मागणी होती. (मी सिलेक्शन समितीचा सदस्य होतो.) परंतु मोदी सरकारने ते आजही मान्य केले नाही. मधल्या काळात पेट्रोल व डिझेलवर जीएसटीच्या रूपाने केंद्र सरकारने सुमारे २५ लाख रुपये जमा केल्याचा अंदाज आहे.घसरता आर्थिक प्रगतीचा दर : २००४–१४ या यूपीएच्या दहा वर्षांत आर्थिक प्रगतीचा प्रतिवर्षी दर ६.९ टक्के होता; तो २०१४–२४ या मोदी सरकारच्या काळात ५.८ टक्क्यांवर घसरला. म्हणजे आर्थिक प्रगतीच्या बाबतीत मोदी यांच्या काळात देशाची आर्थिक अधोगती झाली.बेरोजगारीचा भस्मासुर : २०१४ च्या लोकसभेच्या निवडणुकीत मोदी यांनी प्रत्येक वर्षी दोन कोटी जॉब्स देण्याची गॅरंटी दिली होती. म्हणजे गेल्या दहा वर्षांत २० कोटी जॉब्स निर्माण व्हायला हवे होते. हतबुद्ध करणारी बाब म्हणजे केंद्रीय श्रममंत्री भूपेंद्र यादव यांनी संसदेत सांगितल्यानुसार २०१४ नंतर देशात केवळ एक कोटी २५ लाख रोजगार निर्माण करण्यात आले. जे हंगामी कामगार भविष्य निर्वाह निधीसाठी आपले नाव नोंदवतात, त्यांची गणना मोदी सरकार नवीन रोजगारामध्ये करते. हे हास्यास्पद आहे. सरकारी माहितीनुसार आज देशात बेरोजगारीचा दर साधारण आठ टक्के आहे.सुशिक्षित बेरोजगारी : देशात सुशिक्षित बेरोजगारीने उच्चांक गाठला आहे. अझीम प्रेमजी यांच्या संस्थेत तयार करण्यात आलेल्या एका अभ्यासानुसार देशातील २५ वर्षांखालील ४२.६ टक्के पदवीधर बेरोजगार आहेत. त्यातून सरकारचा गलथानपणा दिसतोच, परंतु देशातील शिक्षण व्यवस्थेवरील वाभाडेसुद्धा उठून दिसतात. करोनाच्या आपत्तीचे व्यवस्थापन : मोदी सरकारने करोनाच्या आपत्तीचे व्यवस्थापन अत्यंत चुकीच्या पद्धतीने केल्यामुळे लाखो लोकांवर अचानक स्थलांतर करण्याची वेळ आली. लाखोंचा रोजगार बुडाला. लाखो देशोधडीला लागले. करोनाच्या आपत्तीमुळे भारतात पाच लाख ३४ हजार लोक मरण पावले. लस शोधून काढायला उशीर झाला, हे त्याचे प्रमुख कारण असले. तरी तो निर्णय उशिरा व चुकीच्या पद्धतीने घोषित करणात आला, हे त्याचे दुसरे कारण होते. अंतर्गत व परदेशी कर्जाचा डोंगर : आज भारताचे अंतर्गत कर्ज (रु. १५५ लाख कोटी) व परदेशी कर्ज (रु. ५१ लाख कोटी) हे एकूण राष्ट्रीय उत्पन्नाच्या (रु. २९४ लाख कोटी) ७५ इथपर्यंत पोहोचले आहे.शेतकऱ्यांचे दुप्पट उत्पन्न की वाढत्या आत्महत्या : २०१९ मध्ये मोदी यांनी पुढील पाच वर्षांत देशातील शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करणार, अशी हमी दिली होती. हे दुप्पट उत्पन्न सोडा. २०१४ ते २०२२ या आठ वर्षांत प्रत्येक दिवशी ३० याप्रमाणे देशातील एक लाख ४७४ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. त्यांना पॅकेज देणे दूर; त्याची साधी दखलसुद्धा मोदी सरकारने घेतली नाही.

शेतकऱ्यांचे आंदोलन चिरडले : आपल्या रास्त मागण्यांसाठी आंदोलन करणाऱ्या व त्यासाठी दिल्लीला येऊ पाहणाऱ्या शेतकऱ्यांच्या रस्त्यामध्ये मोदी सरकारने खिळे ठोकले, तटबंदी निर्माण केली, यावरून त्यांच्या शेतकऱ्यांकडे पाहण्याचा दूषित दृष्टिकोन दिसून येतो. तरीही, मागील वेळी शेतकऱ्यांच्या संघटित ताकदीमुळे मोदी सरकारला शेतकरीविरोधी तीन कृषी विधेयके संसदेत संमत झाली असतानाही मागे घेण्याची नामुष्की पत्करावी लागली.मोठ्या उद्योगपतींना कर्जमाफी : अर्थमंत्र्यांच्या म्हणण्यानुसार २०१४–१५ ते २०२१–२२ या काळात सार्वजनिक बँकांचे बुडीत कर्ज सुमारे ६६ लाख कोटी रु. होते. त्यापैकी १४ लाख ५० हजार कोटी रु. कर्ज माफ करण्यात आले. कर्ज माफ करण्यात आलेले सर्व मोठे व मध्यम उद्योगपती आहेत. परंतु लाखभर शेतकऱ्यांना एक रुपयासुद्धा कर्जमाफी देण्यात आली नाही.

# विश्वचषकाचा थरार

भारतात सध्या लोकशाहीचा उत्सव सुरू आहे. लोकसभेसाठी मतदान सुरू असून चार जूनला त्याचा निकाल लागणार आहे. कोण निवडून येणार, कोण पराभूत होणार याबाबत चांदा ते बांदा अशी चर्चा रंगलेली असताना आता त्यात आणखी एका चर्चेची भर पडली आहे आणि ती म्हणजे टी–२० विश्वचषकाची. यंदा रोहित शर्माच्या नेतृत्वाखाली खेळणारा भारतीय संघ हा गेल्या चौदा वर्षांपासून विश्वचषकाच्या प्रतीक्षेत आहे. हा दुष्काळ यावर्षी तरी संपेल असे म्हणत म्हणत एक तपाहून अधिक काळ लोटला. आयपीएलमध्ये घाम घाळणारे खेळाडू विश्वचषकात कोणकोणत्या संघाला पाणी पाजतील, हा औत्सुक्याचा विषय आहे.

अमेरिका आणि वेस्ट इंडिज यांच्यात संयुक्तरीत्या टी–२० विश्वचषकाचे सामने आयोजित करण्यात आले आहेत. या दोन्ही देशांतील एकूण ९ मैदानांवर या स्पर्धेचे एकूण ५५ सामने खेळवले जाणार आहेत. हा विश्वचषक अनेकार्थांनी वेगळा असणार आहे. कारण त्यात पात्रता फेरी खेळली जाणार नाही. शिवाय भारतीय फलंदाजाकडून गेल्या तेरा वर्षांत एकही शतक झळकावले गेले नाही. ही उणीवही यंदा भरून निघावी अशी चाहत्यांची अपेक्षा आहे. २ मे २०१० रोजीच्या सामन्यात सुरेश रैनाने शेवटचे शतक ठोकले. यात ६० चेंडूत १०१ धावा तडकावल्या. यात नऊ चौकार आणि पाच षटकारांचा समावेश होता. भारतीय संघात रोहित शर्मा, विराट कोहली, यशस्वी जयस्वाल यांच्यासारखे धुरंधर फलंदाज आहेत आणि ते शतक ठोकण्याची क्षमता राखून आहेत. टी–२० च्या विश्वचषकाच्या इतिहासात आतापर्यंत ११ शतके झळकली आहेत. इंग्लंड, न्यूझिलंड, वेस्ट इंडिजकडून सर्वाधिक दोन–दोन शतके नोंदली गेली आहेत,त्याचवेळी भारत, श्रीलंका, दक्षिण आफ्रिका, पाकिस्तान आणि बांगलादेश यांच्याकडून प्रत्येकी एक शतक लगावले गेले. टी–२० मध्ये दोनदा शतक झळकवणारा ख्रिस गेल हा एकमेव खेळाडू आहे. यंदाच्या विश्वचषकाच्या निमित्ताने आतापर्यंतच्या टी–२० विश्वचषकाच्या इतिहासात भारतीय कामगिरीचा वेध घेणे औचित्याचे ठरेल. २००७ मध्ये २००९ च्या विश्वचषकात भारतीय संघाकडून खूप अपेक्षा होत्या. गतविजेता भारत यंदाही विश्वचषक राखेल, असे वाटत होते. मात्र वेस्ट इंडिज, इंग्लंड आणि दक्षिण आफ्रिका संघांकडून सलग तीन पराभव स्वीकारल्याने भारताचे आव्हान संपुष्टात आले. तथापि, या स्पर्धेमध्ये मधल्या फळीचा फलंदाज युवराज सिंहची बॅट नेहमीप्रमाणे तळपली. त्याने स्पर्धेत भारताकडून सर्वाधिक १५३ धावा काढल्या होत्या. प्रज्ञान ओझा हा सर्वाधिक बळी घेणारा ठरला होता. २०२२ मध्ये रोहित शर्मा याच्या नेतृत्वाखाली खेळणा–या संघाने उपांत्य फेरीपर्यंत धडक मारली. मात्र या सामन्यात इंग्लंडचा फलंदाज जोस बटलरने ४९ चेंडूत ८० धावा आणि अलेक्स हेल्सने ४७ चेंडूत ८६ धावा काढल्या आणि भारताच्या पदरी निराशा पडली.मागच्या टी–२० विश्वचषकाची स्थिती पाहिली तर टीम इंडियातील खेळाडू दुखापतीने त्रस्त झाले होते. मोक्याच्या क्षणी जसप्रित बुमराह संघाबाहेर गेला आणि तो मोठा धक्का होता. विश्वचषकाच्या अगोदर खेळाडूंना विश्रांती





सुपर–१२ टप्पाही होणार नाही. भारताचा पहिला सामना ५ जून रोजी आयर्लंडविरुद्ध होणार आहे. तसेच पाकिस्तानविरुद्ध भारताचा सामना ९ जून रोजी होईल. या विश्वचषकासाठी टीम इंडियाच्या १५ खेळाडूंची नावे जाहीर झाली असून अपेक्षेप्रमाणे रोहित शर्माकडे कर्णधारपद तर हार्दिक पांड्याच्या खांद्यावर उपकर्णधारपदाची जबाबदारी आली आहे. सध्या भारतीय संघातील खेळाडूंना दुखापतीने ग्रासले आहे.

भारतीय संघाने २०१३ च्या चॅम्पियन्स ट्रॉफीनंतर एकही आयसीसी चषक जिंकलेला नाही. तसेच २००७ पासून भारताने टी–२०चा विश्वचषक जिंकलेला नाही. या पार्श्वभूमीवर यंदाचा विश्वचषक हा दुष्काळ संपविण्यासाठी भारतासाठी सुवर्णसंधी आहे. अर्थात गेल्या वर्षी भारताला आयसीसी जिंकण्याची दोनदा संधी मिळाली, मात्र दोन्ही वेळी अंतिम सामन्यांत ऑस्ट्रेलिया संघाकडून पराभव स्वीकारावा लागला. दक्षिण आफ्रिकेत पार पडलेला टी–२० विश्वचषक भारतासाठी ऐतिहासिक ठरला. महेद्रसिंह धोनीच्या नेतृत्वाखाली खेळणा–या संघाचा फलंदाज गौतम गंभीरने जोहान्सबर्ग येथे खेळल्या गेलेल्या अंतिम सामन्यात ५४ चेंडूत ७५ धावा तडकावल्या आणि मोठी धावसंख्या उभारली. परंपरागत प्रतिस्पर्धी पाकिस्तानला पाच धावांनी पराभूत करत भारताने विश्वचषकावर नाव कोरले होते. १९८३ नंतर भारताचे पहिले घवघवीत यश होते. हा विश्वचषक आणखी एका घटनेसाठी लक्षात राहिला, तो म्हणजे धडाकेबाज फलंदाज युवराज सिंगने इंग्लंडच्या स्टुअर्ट ब्रॉडला सहा चेंडूत सहा षटकार मारले होते. तसेच डर्बन येथे दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या सामन्यात आर. पी. सिंहने तेरा धावांत चार बळी टिपले होते. या विजयानंतर धोनीसेनेचे भारतात ‘न भूतो न भविष्यति’ असे स्वागत झाले होते. देण्याची मागणी अनेकांनी केली. परंतु बीसीसीआयने खेळाडूंना विश्रांती न दिल्याने अनेक जण जायबंदी झाले. आताही तेच घडले आहे. टीम इंडियाच्या खेळाडूंना आराम द्यावा, अशी मागणी तज्ज्ञांकडून केली जात आहे. रोहित शर्माला देखील काही काळ विश्रांती देणे गरजेचे होते, परंतु तसे घडले नाही. भारतीय संघात अनुभवी खेळाडूंबरोबरच तरुणांवर विश्वास व्यक्त करण्यात आला आहे. रोहित शर्मा, विराट कोहली, सूर्यकुमार यासारखे अनुभवी तारे असून यशस्वी जयस्वाल, अर्शदीप सिंह, शिवम दुबे यासारखे यंगस्टर्स देखील आहेत. भारतीय संघात पाच फलंदाज, दोन यष्टीरक्षक, दोन फिरकीपटू आणि तीन वेगवान गोलंदाजांचा समावेश आहे. या टीमद्वारे भारताचा विजेतेपदाचा दुष्काळ संपावा, हीच तमाम क्रिकेटप्रेमी भारतीयांची इच्छा आहे.

# जोखीम उचलावीच लागेल!

मागच्या अनेक वर्षांपासून आपण ज्या महत्त्वाकांक्षी प्रकल्पासाठी प्रयत्नरत होतो तो चाबहार बंदर विकास प्रकल्पाचा करार नुकताच भारत व इराणमध्ये झाला आहे. चाबहार बंदर विकास हा भारताच्या व्यापारवाढीसाठीच नव्हे तर भू–सामरिक आणि आर्थिक धोरणासाठीही महत्त्वाचा प्रकल्प आहे. चाबहार बंदरातील आपली उपस्थिती केवळ आर्थिक–व्यापारी दृष्टिकोनातूनच नव्हे तर व्यूहरचनात्मक दृष्टीनेही अत्यंत महत्त्वाची ठरणार आहे. ती का? हे समजावून घेण्यासाठी भौगोलिकदृष्ट्या या बंदराचे असणारे स्थान लक्षात घ्यावे लागते. चाबहार हे इराणमधील सिस्तन–बलुचिस्तान प्रांतात येते, तर पाकिस्तानच्या बलुचिस्तान प्रांतात ग्वादर हे बंदर येते. दोन्ही बंदरे आग्नेय आशिया–पश्चिम आशिया दरम्यान सागरी मार्गावर मोक्याच्या स्थानी वसलेली आहेत. चीनने आपल्या ‘बेल्ट अँड रोड’ या महत्त्वाकांक्षी प्रकल्पांतर्गत ग्वादर बंदर विकासासाठी पाकिस्तानला मोठ्या प्रमाणावर अर्थसहाय्य केलेले आहे.चाबहार बंदराचे महत्त्व कमी करण्यासाठीच ग्वादर बंदराच्या विकासाचा खटाटोप चीन व पाकिस्तानकडून सुरू आहे. मात्र, पाकिस्तानातील अस्थैर्य, बलुचिस्तानमधील जनतेचा या प्रकल्पास व चीन सहभागास असणारा विरोध यामुळे ग्वादर बंदराच्या विकासाला हवी ती गती अद्याप मिळालेली नाही. पाकिस्तानवरचे आपले व्यापारी अवलंबित्व कमी करण्यासाठी व चीनच्या वाढत्या प्रभावाला उत्तर देण्यासाठी ग्वादर बंदराच्या विकासापूर्वी चाबहार बंदराच्या विकासाचे काम पूर्ण होऊन हे बंदर पूर्ण कार्यक्षमतेने कार्यरत होणे भारतासाठी महत्त्वाचे आहे. तसेच ते इराणसाठीही तेवढेच महत्त्वाचे आहे. भारताबाहेर भारताकडून विकसित होत असलेले चाबहार हे पहिलेच बंदर असणार आहे. चाबहार बंदर नियोजित प्रकारे विकसित झाले, तर अफगाणिस्तान मार्गे मध्य आशिया, युरोप, रशिया अशी विशाल बाजारपेठ भारतासाठी कमी वाहतूक खर्चात खुली होईल. यासाठी महागडा हवाई मार्ग वापरण्याची गरज संपुष्टात येईल. भारताला खनिज तेल, नैसर्गिक वायू आणणे देखील सोयीचे होईल. दक्षिण आशियाचा मध्य आशिया व युरोपशी व्यापार वाढविण्याच्या दृष्टीने उत्तर–दक्षिण वाहतूक मार्गिकेची संकल्पना भारत–रशिया व इराणने मांडली होती. चाबहार बंदर विकासाच्या कराराने त्या दिशेने पहिले पाऊल पडले आहे.मात्र, त्यात आता पश्चिम आशियातील युद्धजन्य स्थिती व अस्थैर्य यामुळे मोठा खोडा निर्माण होण्याची शक्यता आहे. रशिया–युक्रेन युद्ध व इस्रायल–हमास संघर्ष यामुळे पुन्हा एकवार जगाची दोन गटांत विभागणी होते की काय? अशी स्थिती निर्माण झाली आहे. इराणने इस्रायल–हमास संघर्षात हमास बंडखोरांना रसद पुरविणे व इस्रायलविरोधात उघड विरोधी भूमिका घेणे सुरू केले आहे. तर रशिया–युक्रेन युद्धात रशियाची बाजू घेऊन त्यांना ड्रोन सामग्री पुरविली आहे. त्यामुळे इराणने पुन्हा एकवार अमेरिकेची नाराजी ओढवून घेतली आहे. इराण



पुन्हा एकवार आंतरराष्ट्रीय राजकारणात एकाकी पडल्याचे चित्र आहे. इराण व रशिया या दोन देशांशी आजही ज्या मोजक्या देशांचा व्यवहार सुरू आहे त्यात भारताचा समावेश आहे. याबाबत अमेरिकेने भारतावर डोळे वटारलेले आहेत. मात्र, भारताची अपरिहार्यता लक्षात घेऊन कठोर निर्बंधांचे पाऊल अमेरिकेने अद्याप उचललेले नाही. आता चाबहार बंदर विकासाच्या करारानंतर मात्र अमेरिकेने भारताबाबत निर्बंधाची भाषा वापरली आहे. अमेरिका असे निर्बंध भारतावर खरोखरच लादणार का? त्याचे भारतीय अर्थव्यवस्थेवर काय परिणाम होतील याचा विचार भारताला हा करार पुढे नेताना नक्कीच करावा लागणार आहे. यात भारताच्या परराष्ट्र धोरणाची कसोटी लागणार आहे.अर्थात महासत्तांच्या वर्चस्वाच्या लढाईला न जुमानता स्वतंत्र मार्गक्रमण करण्यास आपण मोकळे आहोत, हे स्वायत्तता अधोरेखित करणारे धोरण भारताने वेळोवेळी स्वीकारलेले आहे. आशिया खंडातील चीनच्या वर्चस्वाला रोखू शकणारा मोठा देश व मोठी बाजारपेठ म्हणून अमेरिकेलाही भारताची ही स्वायत्त भूमिका खपवून घेऊन भारताशी मैत्री वाढवावी लागली आहे. अमेरिका व इराणचे संबंध बिघडलेले असताना इराणशी करार करण्यात अमेरिकेची नाराजी ओढवून घेण्याची जोखीम नक्कीच आहे. मात्र, ती देशहितासाठी भारताला उचलावीच लागेल कारण भारताला चीनच्या आव्हानालाही समर्थपणे तोंड द्यावे लगणे तेवढेच निकडीचे आहे. आंतरराष्ट्रीय राजकारणात मोठी भूमिका बजावण्याची महत्त्वाकांक्षा घेऊन भारत पुढे जातो आहे. ही महत्त्वाकांक्षा कायम ठेवायची असेल व देशहित साधायचे असेल तर अशी जोखीम उचलावीच लागेल. अर्थात भारताने ही जोखीम उचलली म्हणून चाबहार बंदराच्या विकासाची वाट मोकळी झाली, असे अजिबात नाही. त्यात इतरही अडथळे आहेतच! चाबहार बंदराच्या विकासाचा प्रकल्प मार्गी लागण्यासाठी अफगाणिस्तानची सहकार्याची भूमिकाही तेवढीच महत्त्वाची आहे. आता अफगाणमध्ये पुन्हा तालिबानची राजवट आली आहे. त्यामुळे ही राजवट भारताला प्रकल्प मार्गी लावण्यात कितपत सहकार्य करेल याबाबत साशंकताच आहे.

त्यातच सध्या भारतात जसे निवडणुकीचे वातावरण आहे तसेच ते अमेरिकेतही आहे. अशावेळी विद्यमान राज्यकर्ते अधिक आक्रमक भूमिका घेतात हा जगभरातील सार्वत्रिक अनुभव! महासत्ता अमेरिकाही त्याला अजिबात अपवाद नाही. त्याची झलक बायडेन यांनी नुकतीच दाखविली आहे. चीनच्या अनेक वस्तूंवर अचानक मोठ्या प्रमाणात आयात शुल्क वाढविण्याचा निर्णय बायडेन प्रशासनाने घेतला आहे. त्यामुळे इराणसोबतच्या भारताच्या करारावरून अमेरिका भारतावर डोळे वटारण्याची व काही कठोर निर्णय घेण्याची शक्यता नाकारता येत नाही. मात्र, अमेरिकेच्या या डोळे वटारण्याची जोखीम भारताला उचलावीच लागेल तरच चीन–पाकिस्तानच्या भारताविरुद्धच्या अभद्र युतीला चोख उत्तर देणे भारताला शक्य होईल. तसेही भारताबाबत कठोर निर्णय घेणे अमेरिकेलाही परवडणारे नाही. चीनच्या वर्चस्वाला रोखण्यासाठी अमेरिकेला भारताची नितांत गरज आहे. या स्थितीचा भारताने आता आपल्या फायद्यासाठी वापर करून घ्यायलाच हवा. शेवटी जोखीम उचलल्याशिवाय फायदा मिळवता येत नाहीच!

# आपले मत वाया जात नाही..!

आंबेडकरी, रिपब्लिकन, वंचीत च्या समर्थकांना, निवडणूक काळात एक गोष्ट हमखास खोटे बोलली जाते, की तुम्ही दिलेले ीश वोट वाया जाते... परंतु तुम्ही काँग्रेसला किवा बीजेपीला मत दिले तर वाया जात नाही... हे साफ खोटे आहे कारण त्यांना आंबेडकरी रिपब्लिकन वंचीत बहुजन पक्ष यांना राज्य आणि राष्ट्रीय पातळीवर नेतृत्व करण्यापासून रोकण्यात येते आहे. मायावतीला सुध्दा घरी बसवून ठेवण्यात आले, फक्त प्रेस कॉन्फरन्स श्शरवशी लिडर बनवुन ठेवले, आणि वंचितला सुद्धा असेच नामोहरम करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे... कारण त्यांना माहीत आहे, एक अंबेडकर भारी पडला म्हणुन पुन्हा दुसरा आंबेडकर होऊ द्यायचा नाही... त्यासाठी आपल्याच काही बुध्दिमान लोकांचा बुध्दिभेद करुन वापर केला जातो... आणि म्हणतात वंचितला मत दिले तर वाया जाते...

वंचित बहुजन आघाडीला मत देण्याचे फायदे

१) २०१९ मध्ये तिसरी आघाडी होती म्हणुन ९.५% म्हणजेच ४५ लाख मत पडले तरी राज्य पक्ष म्हणुन मान्यता मिळाली नाही... परंतु यावेळेस स्वयंबळावर आहोत मागच्या पेक्षा जास्त मते मिळाली तर आपण नक्की राज्य पक्ष होऊ शकतो...

२) राज्य पक्ष बनण्यासाठी किमान ६% च्या वर मते असावे.

३) स्वतःचे पक्ष चिन्ह मिळते.

४) निवडणुक आयोगात आपले प्रतिनिधी पाठवु शकतो, मीटिंग ला हजर राहू शकतो.

५) आंबेडकरी विचारांचे पक्ष म्हणुन स्वतःची लोकशाही संविधानिक विचारधारा स्थापित करता येतो.

६) राज्य ते ग्रामपंचायत पर्यंत पक्ष वाढविण्यास मदत होते.

७) इतर समाजाचे प्रतिनिधी आमदार खासदार निवडून आणण्यास मदत होते.

८) संविधान प्रखरतेने अमलांत आणता येते.

९) आंबेडकरी विचारानुसार देशाची अर्थव्यवस्था सुधारता येईल...

१०) आंबेडकरी विचारानुसार गरिबी निर्मूलन, स्त्री सन्मान व अधिकार, युवा, बेरोजगार, ज्येष्ठ नागरीक योजना राबविता येतील.

तर मग आता लक्षात ठेवा, एवढे फायदे आपल्या पक्षाला मिळत असेल तर आपल्याच फोडून आपल्याच भ्रमीत बांधवांना काँग्रेस व बीजेपी पक्ष राबवून घेऊन आपला वंचित बहुजन आघाडी कसा काय मोठा होऊ देतील... पुन्हा एक म्हणजे आपल्याला पंडीत नेहरू, इंदिरा गांधी, राजीव गांधी, सोनिया गांधी, राहुल गांधी, प्रियंका गांधी, जावई रॉबर्ट वढेरा चालतो... आपल्याला लालू यादव, तेजस्वी यादव चालतो...



आपल्याला मुलायम सिंग यादव, अखिलेश यादव काका मामा चालतो... आपल्याला शोभाताई फडणवीस, देवेंद्र फडणवीस, चालतो... आपल्याला मुंडे परिवार चालतो आपल्याला शिंदे परिवार चालतो.. आपल्याला विलासराव देशमुख, नारायण राणे परिवार चालतो... आपल्याला ठाकरे परिवार चालतो... पण संविधान निर्माता डॉ बाबासाहेब आंबेडकर, यशवंत आंबेडकर, प्रकाश आंबेडकर चालत नाही, ही आपल्या आंबेडकरी रिपब्लिकन वंचित बहुजन समाजातील लोकांची शोकांतिका आहे...

आपले मत कोणत्याही परिस्थितीत वाया जात नाही... आपल्यातील ताई आणि भाऊ यांच्या पासुन सावध रहा... ते फक्त पक्ष फोडी आणि इकडून तिकडे, तिकडून इकडे आणि पक्ष गट प्रमुख बनण्यासाठी राजकारणात आले आहे... करिता कुणाच्याही भूलथापांना बळी न पडता आंबेडकरी रिपब्लिकन पक्ष म्हणजेच वंचित बहुजन आघाडी पक्षाला भरभरून मते द्या... आणि वंचित बहुजन आघाडीला राष्ट्रीय पक्ष बनवा...!

संविधान सुरक्षित तर भारतीय लोकतंत्र सुरक्षित..!!

## शारिरीक अन् मानसिक आरोग उत्तम राखण्यासाठी घरच्या घरी करा 'या' सोप्या ॲक्टिव्हिटीज

सध्याच्या काळात जिमला जाणे, ही एक फॅशनच बनली आहे. सर्व वयोगटाती व्यक्ती जिमा जाण्याला प्राधान्य देताना दिसतात. कुणी सकाळी तर कुणी संध्याकाळी जिममध्ये जातात. शरीर निरोगी ठेवण्यासाठी आणि उत्तम फिटनेस राखण्यासाठी शारिरीक हालचाल करणे, गरजेचे आहे. त्यासाठी, योगा, व्यायाम, जिममधील वर्कआऊट इत्यादी अनेक गोष्टी तुम्ही करू शकता.परंतु, फिटनेस राखण्यासाठी केवळ जिममध्येच जाणे, हे आवश्यक नाही. तुम्ही जिममध्ये न जाता आणि घरच्या घरी देखील उत्तम व्यायाम प्रकार करू शकता. तज्ज्ञांच्या मते तुम्ही जिमला न जाता ही शारिरीक हालचाली करून तंदूरूस्त आणि निरोगी राहू शकता.आज आम्ही तुम्हाला अशाच काही फिजिकल ॲक्टिव्हिटींबद्दल (शारिरीक हालचालींबद्दल) सांगणार आहोत. या शारिरीक हालचाली तुम्ही घरात राहून करू शकता. चला तर मग जाणून घेऊयात या फिजिकल ॲक्टिव्हिटींबद्दल. नृत्य करणे फायदेशीर नृत्य केल्याने आपल्या संपूर्ण शरीराची हालचाल होते. शिवाय, शरिरातील अतिरिक्त चरबी कमी होण्यास मदत होते. एलिट मेडिकल सेंटरच्या एका अहवालानुसार, दररोज नृत्य करणे हे आरोग्यासाठी अतिशय फायदेशीर मानले जाते.हा संपूर्ण शरीराचा व्यायाम आहे. त्यामुळे, शरीरातील स्नायू मजबूत होतात. दररोज किमान ३० मिनिटे नृत्य केल्याने १५०-२५० कॅलरीज बर्न होतात. शिवाय, आवडत्या गाण्यावर नृत्य केल्याने शारिरीक आणि मानसिक आरोग्य सुधारते.

# आठवड्यातून एक दिवस कोरडा पाळण्याचे आवाहन

संभाजीनगरमध्ये मागील चार वर्षांत ६०५ डेंग्यू दूषित रुग्ण आढळले. डेंग्यूचा ताप विशिष्ट विषाणूमुळे होतो. डेंग्यूचा प्रसार हा 'एडिस इजिप्टाय' नावाच्या डासाच्या मादीमार्फत होतो. या डासाची उत्पत्ती साठवलेल्या स्वच्छ पाण्यात होते. यासाठी कोणतेही पाणी आठ दिवसांपेक्षा जास्त साठवू नये, याबाबत नागरिकांनी खबरदारी घेणे आवश्यक आहे, तरच डासाची उत्पत्ती कमी करून नियंत्रणात ठेवता येईल, असे आरोग्य विभागाने सांगितले आहे.




नांदेड जिल्ह्यातील सर्व शासकीय आरोग्य संस्थांत 'राष्ट्रीय डेंग्यू दिन' गुरुवारी (ता. १६) साजरा होत आहे. २०२४ यावर्षीचे घोषवाक्य 'समुदायाच्या संपर्कात राहा, डेंग्यूला नियंत्रित करा' असे आहे.डेंग्यू ताप आजारात रुग्णास दोन ते सात दिवस तीव्र स्वरूपाचा ताप येतो. डोके, सांधे, स्नायुदुखीचा त्रास होतो. रुग्णास उलट्या होतात. डोळ्याच्या आतील बाजू दुखणे, अंगावर पुरळ येणे, नाक-तोंड यातून रक्तस्त्राव होतो. अशक्तपणा येणे, भूक मंदावते, तसेच तोंडाला कोरड पडते ही लक्षणे प्रामुख्याने दिसून आलेल्या रुग्णांनी वेळेत जवळच्या शासकीय रुग्णालयात जाऊन मोफत तपासणी व उपचार करून घेणे आवश्यक आहे.प्रतिबंधात्मक उपाययोजना आपल्या घराभोवताली पाणी साचू देऊ नका.झोपताना पूर्ण अंगभर कपडे घालावीत, पांघरून झोपावे.

सायंकाळी ६ ते रात्री ८ या वेळेत दारे खिडक्या बंद कराव्यात. खिडक्यांना जाळ्या बसवाव्यात. झोपताना चांगल्या मच्छरदाणीचा वापर करावा.आपल्या घरी कीटकनाशक औषधी फवारणी पथक आल्यास घर संपूर्ण फवारून घ्यावे. फवारलेले घर किमान दोन ते अडीच महिने सारवून रंगरंगोटी करू नये.घराच्या छतावरील फुटके डब्बे, टाकाऊ टायर्स, कप, मडकी आदींची वेळीच विल्हेवाट लावावी.

४०० मीटरपर्यंत उडतो एडिस डास

'एडिस इजिप्टाय' हा डास पाच ते सहा मि.मी. लांबीचा असतो. अंगावर पांढरे चट्टे असतात. त्यामुळे याला 'टायगर मॉस्किटोही' म्हणतात. तो दिवसा चावतो. वारंवार चावा घेतो. त्यामुळे आजाराची शक्यता वाढते. हा डास ४०० मीटरपर्यंत उडू शकतो. त्यामुळे आजूबाजूच्या परिसरात या आजाराची लागण होण्याची शक्यता असते. हा डास लोंबकळणाऱ्या वस्तू जसे दोरी, लाइटची वायर, छत्री, काळे कपडे आदी ठिकाणी विश्रांती घेतो.

नागरिकांनी दक्षता घेतल्यास डासाची उत्पत्ती होणार नाही व डास चावणार नाही. योग्य काळजी आणि वेळीच केलेला उपचार प्रत्येकाला होणाऱ्या आजारापासून दूर ठेवतो. त्यासाठी कीटकजन्य आजारावर नियंत्रण ठेवण्यासाठी सर्वांनी हातभार लावून आरोग्य यंत्रणेला सहकार्य करावे.

## तंदूरुस्त शरीरासाठी रोज करा झुम्बा, नैराश्यासह 'या' समस्यांपासून मिळेल आराम



निरोगी जीवनशैलीसाठी नियमित व्यायाम करणे आणि संतुलित आहार घेणे अतिशय गरजेचे आहे. आजकाल अनेक जण तंदूरूस्त राहण्यासाठी वर्कआऊट, व्यायाम, योगा आणि झुम्बाची मदत घेतात. सर्व वयोगटातील व्यक्तींसाठी झुम्बा डान्स फायदेशीर आहे. झुम्बा डान्सच्या माध्यमातून वर्कआऊट करण्याचा ट्रेंडही मोठ्या प्रमाणात वाढला आहे. झुम्बा डान्स नियमित केल्याने उत्तम फिटनेस राखण्यात मदत होते. या वर्कआऊटद्वारे तुम्ही तुमचे शरीर लवचिक बनवू शकता तसेच शरीरातील अतिरिक्त चरबी कमी करू शकता. जिममध्ये केल्या जाणाऱ्या वर्कआऊटच्या तुलनेत झुम्बा डान्स अतिशय फायदेशीर मानला जातो. झुम्बा डान्समध्ये सालसा, हिपहॉप आणि बेली डान्स इत्यादी अनेक प्रकारच्या नृत्यशैलींच्या स्टेप्सचा समावेश असतो. आज आपण झुम्बा केल्याने आरोग्याला होणारे फायदे कोणते? ते जाणून घेणार आहोत.


ताण-तणाव कमी होतो नियमितपणे झुम्बा डान्स केल्याने ताण-तणाव कमी होण्यास मदत होते. शारिरीक आरोग्यासोबतच मानसिक आरोग्य सुधारण्यास मदत होते. रोज झुम्बा डान्स केल्याने शरीरातील सेरोटोनिन हार्मोनचे उत्पादन वाढते. हा एक प्रकारचा आनंदी संप्रेरक आहे, जो आपला मूड नियंत्रित ठेवण्याचे काम करते. झुम्बा केल्याने हा आनंदी संप्रेरक बाहेर पडतो ज्यामुळे, मूड सुधारतो आणि ताण-तणाव, नैराश्य दूर होते.शरीराला मिळते भरपूर ऊर्जा दररोज झुम्बा डान्सचा सराव केल्याने आपल्या शरीराची हालचाल चांगली होते. ज्यामुळे, शरीरातील स्नायूंमध्ये रक्ताभिसरणाची प्रक्रिया चांगली होते. यामुळे, आपले शरीर मजबूत होण्यास मदत होते आणि शरीराला भरपूर ऊर्जा मिळते. झुम्बा केल्याने शरीर सक्रिय राहते आणि हातपायांचे स्नायू मजबूत होतात.

वजन कमी होते नियमितपणे झुम्बा डान्सचा सराव केल्याने वजन झपाट्याने कमी होण्यास मदत होते. तसेच, झुम्बा डान्स करताना आपले शरीर सक्रिय होते. त्यामुळे, शरीरातील अतिरिक्त चरबी वितळू लागते. वजन कमी करण्यासाठी झुम्बा फायदेशीर असला तरी याचा नियमित सराव करणे गरजेचे आहे.डिस्क्लेमर : सदर लेख फक्त सामान्य माहितीसाठी आहे. सकाळ माध्यम समूह अशा कोणत्याही गोष्टींची पुष्टी करत नाही. अधिक तपशीलांसाठी तुम्ही तज्ज्ञांचे मार्गदर्शन घेऊ शकता.

# मृत्यूंचे सापळे

घाटकोपर येथे पेट्रोल पंपावर कोसळलेल्या महाकाय होर्डिंगमुळे मृत्यू झालेल्यांची संख्या १६ वर पोहोचली असून ८८ जण जखमी झाले आहेत. या ठिकाणी अजूनही बचावकार्य सुरू असून आणखी काही लोक या होर्डिंगखाली अडकल्याची भीती व्यक्त केली जात आहे. सोमवारी सायंकाळी ४ वाजता मुंबईत अचानक आलेल्या वादळी पावसामुळे घाटकोपर पूर्व छेडानगर येथील पेट्रोल पंपाजवळील महाकाय होर्डिंग कोसळले. पालिकेच्या नियमानुसार होर्डिंगचा आकार ४० बाय ४० फूट असणे अनिवार्य असताना लोहमार्ग रेल्वे पोलिस विभागाच्या अखत्यारित असलेले हे १२० बाय १२० फुटांपेक्षा जास्त आकाराचे होर्डिंग बेकायदेशीररीत्या उभारण्यात आले होते. हे होर्डिंग उभारताना मजबूत पाया नसल्याचे पालिकेच्या निदर्शनास आले आहे. या घटनेनंतर रेल्वे हद्दीतील सर्व होर्डिंगचे सर्वेक्षण करण्यात आले असून त्यात तब्बल ९९ ठिकाणचे होर्डिंग 'ओव्हर साईज' असल्याचे आढळून आले आहेत. म्हणजेच मुंबईकरांचा जीव टांगणीला लागला आहे! जाहिरात आणि पंप उभारण्यात आलेली जमीन राज्य सरकारने पोलिस हाऊसिंगला दिली होती.

त्यांनी ती जागा लोहमार्ग पोलिसांना दिली. लोहमार्ग पोलिसांकडून ही जागा पंप उभारण्यासाठी टेंडर काढून देण्यात आली. त्यामुळे या ठिकाणी उभारण्यात आलेला पंप बेकायदेशीर असल्याचा दावा पालिकेने केला आहे. सध्या पंपचालक फरार असल्याने पंपाचा मालक कोण असा प्रश्न उपस्थित झाला आहे. या होर्डिंग प्रकरणाचे राजकीय पडसाद उमटले आहेत. भाजप आमदार राम कदम यांनी आरोपी भावेश भिंडे आणि उद्धव ठाकरे यांचा फोटो समाजमाध्यमावर शेअर केल्यानंतर सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये कलगीतुरा रंगला. भाजप नेते किरीट सोमय्या यांनीही महापालिकेतील भ्रष्टाचाराचा मुद्दा पुढे करत उद्धव ठाकरेंवर शरसंधान करण्याचा प्रयत्न केला. मुंबईतील होर्डिंगमाफियांना महाभ्रष्ट युती सरकारचे संरक्षण असून राज्य सरकार व पालिकेवरच सदोष मनुष्यवधाचे गुन्हे दाखल करा, अशी मागणी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केली. या सर्व आरोप-प्रत्यारोपांत सरकारमधील मंत्री छगन भुजबळ यांनी मात्र उद्धव ठाकरे यांची पाठराखण करत सरकारलाच घरचा आहेर दिला. भुजबळ म्हणाले, सरकार आमचं, महापालिका आमचीच, मग उद्धव ठाकरेंचा काय संबंध? असे अनेक व्यापारी आमच्याकडे पुष्पगुच्छ, मिठाई घेऊन येतात, आमच्यासोबत फोटो काढतात. त्यांना नाही म्हणता येत नाही.





संबंधित व्यक्ती आपला कार्यकर्ता आहे की नाही हे आम्हाला माहीत नसते. मुंबईत पावसाळ्यात अनेक दुर्घटना घडतात, दुर्घटना घडल्यानंतर महापालिका प्रशासन आणि राज्य सरकारला जाग येते ही वस्तुस्थिती आहे. मुख्यमंत्र्यांच्या बालेकिल्ल्यात अनधिकृत बांधकामे आणि होर्डिंग्जना पेव फुटल्याचे बोलले जात आहे. ठाण्यात होर्डिंगला परवानगी देताना चुकीच्या पद्धतीने परवानगी देण्यात आली असून शहरातील फुटपाथ आणि नाल्यात होर्डिंग उभारण्यात आले आहेत. अशी स्थिती केवळ मोठ्या शहरात आहे असे नाही, छोट्या शहरातही तीच स्थिती आहे. पालिकेची परवानगी न घेता फलक उभारले जातात. कोणीही सोम्या-गोम्या शहरात, गावात येणार असला की त्याच्या स्वागतार्थ चांगल्या रस्त्याची दुर्दशा उठवून बांबू रोवून बॅनर्स लावले जातात. त्यानंतर रस्त्यावरील खड्डे बुजवण्याची तसदी घेतली जात नाही. कोणत्याही छोट्या-मोठ्या शहरात हे दृष्य हमखास दिसते. कुठल्याही यंत्रणेच्या बेपर्वाईमुळे सर्वसामान्यांचे बळी जात असतील तर तो हत्येइतकाच गंभीर प्रकार मानला गेला पाहिजे.

मुंबईत जी दुर्घटना घडली त्या संदर्भात असे दिसते की, अनधिकृतरीत्या होर्डिंग उभारणा-या कंत्राटदाराला नोटीस बजावण्याचा फार्स काही दिवसांपूर्वी महापालिकेने पार पाडला होता. पण महापालिकेचा ढिसाळ कारभार पुरता ओळखून असलेल्या कंत्राटदाराने ती नोटीस पोलिकेच्याच कच-याच्या ढिगा-यात टाकून दिली असावी. आता सारी यंत्रणा कामाला लावून जाहिरात कंपनीविरोधात पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आता परवानगी नेमकी कोणी दिली यावरून महापालिका आणि रेल्वे प्रशासनात टोलवाटोलवी सुरू झाली आहे. दुर्घटनेत जे बळी गेले, प्राणहानी झाली, त्यांच्या कुटुंबीयांची जी अपरिमित हानी झाली त्याला जबाबदार कोण? महापालिकेच्या हद्दीत महिनोंमहिने एखादे अनधिकृत होर्डिंग उभे राहते आणि महापालिका केवळ नोटिसा पाठवण्याचे नाटक करत राहते. यामागचे कारण उघड आहे. निष्काळजीपणा आणि निर्ढावलेली यंत्रणा हेच ते कारण! ही यंत्रणा कोणत्याही दुर्घटनेची अंतिम जबाबदारी न स्वीकारता दुस-याच कुणाला तरी बळीचा बकरा करून स्वत: नामानिराळे राहण्यात निष्णात असते. दुसरे म्हणजे पालिकेलाही काही मर्यादा असतात. शहराचे विद्रुपीकरण करणा-या होर्डिंगमध्ये राजकारणी मंडळींचा होर्डिंगचा भरणा मोठ्या प्रमाणावर असतो. पालिकेत चालणा-या भ्रष्टाचारामुळे रस्त्यांची कामे निकृष्ट दर्जाची होतात. पहिल्याच पावसात रस्ते उखडले जातात.

खड्ड्यांमुळे होणा-या अपघातात नागरिकांना प्राण गमवावे लागतात. गेंड्याच्या कातडीचे लोकप्रतिनिधी आणि प्रशासनातील अधिकारी आपले खिसे भरण्यासाठी अशा प्रकारांबाबत डोळ्यावर कातडे ओढून असतात. वेगवेगळ्या घटनांमध्ये नागरिकांचे बळी जाऊनही यंत्रणा सुस्तच राहणार असेल तर ते अतिशय संतापजनक आहे. कुठलीही दुर्घटना घडली की नियमांचा आडोसा घेत आपला बचाव करण्यात अधिकारी वर्ग पारंगत असतो. संबंधित कंत्राटदाराविरुद्ध पोलिसांत गुन्हा दाखल केला की अधिकारी वर्ग पुढील कामासाठी मोकळा होतो. एखाद्या दुर्घटनेला अधिकारी जबाबदार असेल तर त्याच्यावरही गुन्हा दाखल झाला पाहिजे. त्याशिवाय खाबुगिरी आणि काटेकोरपणे पडताळणी न करता बिल्डर्सना बेधडकपणे दिल्या जाणा-या प्रमाणपत्रांना आळा बसणार नाही. ज्या यंत्रणेने नागरिकांच्या सुरक्षेची काळजी घ्यावयास हवी तीच यंत्रणा जागोजागी मृत्यूचे सापळे उभे करत आहे असे खेदाने म्हणावे लागते.

## घाटकोपर पेट्रोल पंप, होर्डिंगमधून वर्षाला ५० कोटी रूपयांची कमाई

घाटकोपर : येथील छेडा नगरमध्ये सोमवारी दुर्घटना घडली. या ठिकाणी पेट्रोल पंपावर असलेल्या १२० बाय १२० फुटांचे भलेमोठ होर्डिंग कोसळले. या घटनेस चार दिवस उलटून गेले आहेत, तरीही मलाबा उचलण्याचे काम पूर्ण झाले नाही. या घटनेत आतापर्यंत १६ जणांनी प्राण गमावले आहेत.या होर्डिंग दुर्घटनेनंतर राजकीय नेत्यांकडून अनेक आरोप-प्रत्यारोप होत आहेत. या प्रकरणात भाजप नेते किरीट सोमय्या यांनी उद्धव ठाकरे आणि संजय राऊत यांचे बंधू सुनील राऊत यांच्यावर नाव न घेता आरोप केला आहे. घाटकोपर पेट्रोल पंप आणि होर्डिंगमधून वर्षाला ५० कोटींची कमाई होत होती. त्यात मातोश्रीचा आणि भांडुपचा हिस्सा किती होता? असा प्रश्न सोमय्या यांनी विचारला आहे.घाटकोपर पेट्रोल पंप आणि होर्डिंगच्या जाहिरात फलकाची जागा ही महाराष्ट्र सरकारच्या पोलीस हाऊसिंग सोसायटीची आहे. परंतु २०२०-२०२१ मध्ये तत्कालीन उध्दव ठाकरे सरकारने बेकायदेशीररित्या लॉर्डस मार्क इंडस्ट्रिज लि. या खाजगी कंपनीला पेट्रोल पंप दिला. तसेच या जागेवर होर्डिंग लावण्याचे कंत्राट भावेश भिंडे यांच्या मे. इगो मेडीया प्रा. लि. कंपनीला दिले, असा आरोप किरीट सोमय्या यांनी केला. या पेट्रोल पंपाची वार्षिक कमाई २५ कोटी होती. तसेच होर्डिंगची वार्षिक कमाई २५ कोटी होती.

रेल्वे पोलिसांच्या जागेत हे होर्डिंग उभारण्यात आले होते. या चारही होर्डिंगसाठी इगो मीडिया 'जीआरपी'ला वर्षाला २४ लाख रुपये भाड्यापोटी द्यायचे. त्याशिवाय डिपॉझिट म्हणून ४० लाख रुपये भरले होते. भाड्यातून जमा होणारा हा सर्व पैसा जीआरपी कल्याण निधीमध्ये जमा व्हायचा. होर्डिंगच्या माध्यमातून जीआरपी वेलफेअर फंडासाठी निधी उभारायचा होता. म्हणून जीआरपीने ऑक्टोबर २०२० मध्ये होर्डिंगसाठी निविदा काढल्या होत्या. इगो मीडियाने सर्वाधिक बोली लावली म्हणून जीआरपीने होर्डिंग लावण्याची परवानगी त्यांना दिली. तीन होर्डिंग २०२१ मध्ये लावण्यात आले. चौथ होर्डिंग जे कोसळले, ते २०२२ मध्ये लावण्यात आले होते.भावेश भिंडेच्या हाती शिवबंधन : भावेश भिंडेला आमदार सुनील राऊत हे उद्धव ठाकरे यांच्याकडे घेऊन गेले होते. त्याला शिवबंधन बांधले होते. त्यामुळे पेट्रोल पंप आणि होर्डिंगमधून मिळणा-या ५० कोटींतून मातोश्रीला किती पैसे जातात आणि भांडूपला किती पैसे येतात याचा हिशोब द्यावाच लागणार असल्याचे किरटी सोमय्या यांनी माध्यमांशी बोलताना म्हटले आहे.

# शस्त्राचा धाक दाखवून विदेशी दारूचा ट्रक लुटणारे ०४ आरोपींना स्थानिक गुन्हे शाखेने ७२ लाख रुपयांच्या मुद्देमालसह ७२ तासातच जेरबंद केले




लातूर :– शस्त्राचा धाक दाखवून विदेशी दारूचा ट्रक लुटणारे ०४ आरोपींना स्थानिक गुन्हे शाखेने ७२ लाख रुपयांच्या मुद्देमालसह ७२ तासातच जेरबंद केले. याबाबत थोडक्यात माहिती अशी की दि. १२ मे रोजी मध्यरात्री नागपूर तुळजापूर महामार्गावरील आष्टा येथील टोलनाक्याजवळ दोन वाहनातून आलेल्या काही अज्ञात चोरट्यांनी शस्त्राचा धाक दाखवून विदेशी मद्याची वाहतूक करणाऱ्या कंपनीचा ट्रक मध्ये बसलेल्या चालक व हेल्पर इतर दोन इसमांना मारहाण करून लुटल्याची घटना घडली होती. ट्रक चालकाने दिलेल्या फिर्याद वरून पोलीस ठाणे चाकूर येथे गुन्हा रजिस्टर क्रमांक २३५/२०२४ कलम ३९५, ३४१, ५०६ भादवी व ४, २५ शस्त्र अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्हा दाखल होताच पोलीस अधीक्षक सोमय मुंडे व अप्पर पोलीस अधीक्षक डॉ. अजय देवरे यांनी घटनास्थळास भेट देऊन पाहणी केली व गुन्ह्याच्या तपासकामी स्थानिक गुन्हे शाखेचे व पोलीस ठाणे चाकूर येथील पोलीस अधिकारी अमलदारांचे विविध पथके तयार करून त्यांना मार्गदर्शन व सूचना देऊन विविध ठिकाणी तात्काळ रवाना करण्यात आले.

दरम्यान स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलीस पथकाने बीड, धाराशिव, सोलापूर व कर्नाटक राज्यातील गुलबर्गा येथे तपास करून सदर पद्धतीचे गुन्हे करणाऱ्या सराईत आरोपींना ताब्यात घेऊन विचारपूस करून, तांत्रिक व गोपनीय माहितीच्या आधारे गुन्ह्यातील अज्ञात आरोपींना निष्पन्न करून त्यांना ताब्यात घेऊन त्यांच्याकडून गुन्ह्यात चोरलेला विदेशी दारूचे ९०० बॉक्स व ट्रक असा एकूण ७२ लक्ष रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सदरची कारवाई वरिष्ठांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संजीवन मिरकले यांचे नेतृत्वात सहाय्यक पोलीस निरीक्षक विश्वंभर पल्लेवाड, सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रवीण राठोड, पोलीस उपनिरीक्षक संजय भोसले, पोलीस अमलदार रियाज सौदागर, राजेश कंचे, योगेश गायकवाड, प्रदीप स्वामी, राहुल कांबळे, रामहरी भोसले, मनोज खोसे, खुर्रम काझी, राहुल सोनकांबळे, साहेबराव हाके, दीनानाथ देवकते, रवी गोंदकर, तुराब पठाण, नितीन कटारे,मोहन सुरवसे, संतोष खांडेकर, चालक पोलिस अमलदार नकुल पाटील, सचिन मुंडे, प्रदीप चोपणे, चंद्रकांत केंद्रे, व्यंकट निटुरे, सायबर सेल चे सहाय्यक पोलीस निरीक्षक नलिनी गावडे, पोलिस अमलदार संतोष देवडे, गणेश साठे, शैलेश सुडे, केली आहे.

# सोयाबीन बियाणाची उगवण क्षमता तपासूनच पेरणी करावी



उदगीर : लोणी येथे खरीप हंगाम पुर्व गाव बैठक घेण्यात आली. या कार्यक्रमास उदगीर मंडळाचे कृषी अधिकारी फुले साहेब ,कृषी सहाय्यक श्री.जी . एम.तोलसरवाड, यांनी बियाणे उगवण क्षमता, भाऊसाहेब फुंडकर फळबाग योजना,बीजप्रक्रिया, निंबोळी अर्क पहिली फवारणी करणे ,खत व्यवस्थापन यासंदर्भात मार्गदर्शन केले. नितीन दूरकर साहेब यांनीप्रधानमंत्री सूक्ष्म अन्नप्रक्रिया उद्योग योजना विषयी माहिती दिली. सुदर्शन बोराडे तंत्रज्ञान समन्वयक यांनी सोयाबीन लागवड इझ्ञ व शून्य मशागत तंत्रज्ञान व टोकन पद्धत या विषयी सखोल असे मार्गदर्शन केले. बियाणे उगवण क्षमता चाचणीचे प्रात्याक्षिक करून दाखवले जी.एम. तोलसरवाड कृषि सहाय्यक उदगीर यांनी कृषि विभागा अंतर्गत विविध शासकीय योजना व वर अनुदानावर बियाणे उपलब्धतेसाठी अर्ज करण्याचे आवाहन केले. यावेळी कार्यक्रमास सरपंच भुजबळे, उपसरपंच बिराजदार गावातील शेतकरी उपस्थित होते.

# मांडवी वनपरिक्षेत्र अंतर्गत जंगल जळीत व अवैध वृक्ष तोडीच्या चौकशीची मागणी



किनवट.प्रतिनिधी. (शेख शौकत) पांडवी वनपरिक्षेत्रातील कांही वनरक्षक, वनपाल आणि वनपरिक्षेत्र अधिकारी–याच्या कार्यशैलीवर कर्तव्य सुरतेचे प्रश्नचिन्ह निर्माण होतांना दिसतात. जंगल जळीत प्रकरण, अवैध वृक्षतोडीसह मांडवी वनक्षेत्राचा कांही भाग तेलंगणा राज्याच्या स्वाधिन केल्याच्या घटना समोर आल्या आहेत. सहायक वनसंरक्षक आणि उपवन संरक्षकांचे यागंभीर बाबींकडे सोयीस्कर दुर्लक्ष होतांना दिसते. छत्रपती संभाजीनगरच्या मुख्य वनसंरक्षकांसह नागपूरच्या प्रधान मुख्य वनसंरक्षकांनी तरी वनसंपदा वाचवण्यासाठी मांडवी वनपरिक्षेत्रातील बीटांची चौकशी करुन प्राप्त तक्रारींचा निपटारा करण्याच्या मागणीने जोर धरला आहे. निर्धारीत वेळेचे औचित्य राखून जाळरेषा तयार न केल्यामुळे अवेळी वनव्याची आग लागून जीवंत वनसंपदा आग्नीच्या भक्षस्थानी दिली जात आहे. त्या आगीत जंगलातील वाळलेली उभी झाडेच जळतील असे नाही तर हिरवी जीवंत झाडे देखिल कांही प्रमाणात आगीचे शिकार होऊन राष्ट्रीय संपत्तीचे अतोनात नुकसान केले जात आहे. जाळरेषाचे काम केले असते तर वनव्याची आग लागत नव्हती. आग लागल्यानंतर तर तात्काळ आग आटोक्यात आणून जंगल आणि जंगली प्राणीमात्रा वाचवण्यासाठी ज यंत्रणेने प्रयत्न केले असते तर खुपकांही नुकसान टाळता आले असते. कसलीही उपाययोजना न केल्याने वनव्याच्या आठवडाभराची व्याप्ती वाढून अपरीमीत नुकसानीला झेलावे लागले. प्रशासनातील अधिकारी–कर्मचारी आजक आहेत उद्या नसतील बदलीवर जातील. नुकसानीच्या परिणामाचा फटका मात्र स्थानिकच्या नागरीकांना सोसावा लागणार आहे. एकमेव अवैध वृक्ष तोडीतून होणारे पर्यावरणीय आणि वन्यजीवांच्या सुरक्षीततेचे नुकसान ज्वलंत आणि विक्राळ समस्या बनू शकते. जंगलाच्या अपरोमीत हानीमुळे वन्यजीवांच्या अधिवासाचा प्रश्न निर्माण होणे स्वाभाविक आहे. वनमंत्री मुनगंटीवारांच्या वनमंत्रालयाने नुसताच आव आणण्यापेक्षा मांडवी रेंजला जाळरेषेसाठी स्वतंत्र निधी दिला असता तर जंगल व वन्यजीव सुरक्षित राहिला असता. जंगलात आजही मोठमोठी लाकडं पडून असतांनाचे वृत्त आहे. तार जाळी वृक्षतोड पणवोठे इत्यादी कामात वरिष्ठ अधिकारी गप्पा का? पाणवोठे तयार करुन वन्यप्राण्यांच्या पिण्याच्या पाण्या पसून वंचित नियमित प्रश्न सोडवीण्यास मदत झाली असती तेलंगणा राज्याकडे भूभाग गेला नसता हे उल्लेखनीय म्हणता येईल.

# उच्च शिक्षण सहसंचालक डॉ. किरणकुमार बोंदर यांचा सत्कार



लातूर :– श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्था, लातूर द्वारा संचलित महात्मा बसवेश्वर महाविद्यालय लातूरचे प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई यांनी विभागीय शिक्षण सहसंचालक कार्यालय, नांदेड विभाग, नांदेड येथील शिक्षण सहसंचाल डॉ. किरणकुमार बोंदर यांचा शाल, महात्मा बसवेश्वर प्रतिमा, स्मृतिचिन्ह आणि पुष्पगुच्छ देऊन यथोचित सत्कार केला. यावेळी कॅप्टन डॉ. बाळासाहेब गोडबोले, डॉ. दीपक चाटे आणि संदीप जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई यांनी महात्मा बसवेश्वर महाविद्यालयाची स्थापना सं १९७०ला झाली असून आज ५४ वर्ष झालेले आहे. हे महाविद्यालय मराठवाड्यातील कला, वाणिज्य, विज्ञान, व्होकेशनल, समाजकार्य आणि बीसीए अशा एकूण सहा शाखा चालवणारे आहे. समाजशास्त्र, इतिहास, भूगोल, राज्यशास्त्र, तत्त्वज्ञान आणि गणित असे एकूण सहा पदव्युत्तर विभाग असून तत्त्वज्ञान, समाजशास्त्र आणि भूगोल या विषयाचे संशोधन केंद्रे आहे. महात्मा बसवेश्वर महाविद्यालयांमध्ये स्थापनेपासून ते आजतागायत महात्मा बसवेश्वर व्याख्यानमाला, असा मी घडलो.... प्रबोधनपर कार्यक्रम अशा सामाजिक उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणीवजागृती निर्माण करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. क्रीडा, राष्ट्रीय छात्र सेना, राष्ट्रीय सेवा योजना आणि कौशल्याधिष्ठित अभ्यासक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना देशाचा एक उत्कृष्ट नागरिक बनविण्याचा प्रयत्न केला जातो असेही ते म्हणाले.

यावेळी बोलताना डॉ. किरणकुमार बोंदर म्हणाले की, महात्मा बसवेश्वर महाविद्यालय हे मराठवाड्यातील शैक्षणिकदृष्ट्या समृद्ध असलेले महाविद्यालय आहे. या महाविद्यालयाला नॅकने अ दर्जा प्रदान केलेला आहे. येणाऱ्या काळामध्ये राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०ची प्रभावी अंमलबजावणी करण्याची जबाबदारी संस्था पदाधिकारी, प्राचार्य, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी यांची आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात विद्यार्थी केंद्रित असून यामध्ये विद्यार्थ्याला अधिकाधिक कौशल्ययुक्त निर्माण करून त्याने स्वतःच्या पायावर उभे राहण्यासाठी प्रयत्नशील असण्यासाठी सातत्याने विविध उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या धोरणामध्ये सैद्धांतिक ज्ञानासोबत प्रात्यक्षिक ज्ञानाला अधिक महत्त्व दिले असल्याचे त्यांनी सांगितले. डॉ. बाळासाहेब गोडबोले यांनी सर्वांचे आभार मानले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी योगेश मोदी यांनी परिश्रम घेतले.

# मुक्कामी एसटी सुरू झाल्याने मोरवड लखमापुर पळशी चाडगाव मध्ये स्वागत



रेणापूर / प्रतिनिधी :– बर्याच वर्षांनंतर प्रथमच मोरवड लखमापुर पळशी चाडगाव पंचक्रोशीतील नागरिकांनी केले स्वागत मौजे मोरवड येथे मुक्कामी एसटी सुरू झाल्याने गावकऱ्यांनी बस वाहक बस ड्रायव्हर यांचे फुल. शाल. श्री फळ देऊन स्वागत केले व गावकऱ्यांच्या वतीने राहण्याची व्यवस्था करण्यात आली या वेळी उपसरपंच किशन क्षीरसागर, वसंत क्षीरसागर, गणपत जाधव, देवीदास बने,गंगाधरनाना घोडके, समाधान क्षीरसागर, सुरेश जाधव, दामोदर पाटील आदि उपस्थित होते.

# काँग्रेसच्या ४३ उमेदवारांची दुसरी यादी जाहीर

नवी दिल्ली : आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर काँग्रेसने आपल्या उमेदवारांची दुसरी यादी जाहीर केली आहे. यत आसाम, गुजरात, मध्य प्रदेश, उत्तराखंड, राजस्थान आणि दमण दीवमधील ४३ उमेदवारांची घोषणा करण्यात आली आहे. मध्य प्रदेशातील हायप्रोफाईल जागा मानल्या जाणा–या छिंदवाडा मतदारसंघातून माजी मुख्यमंत्री कमलनाथ यांचे पुत्र नकुलनाथ यांना तिकीट दिले आहे. तर, राजस्थानचे माजी मुख्यमंत्री अशोक गेहलोत यांचे पुत्र वैभव गेहलोत यांना जालोर मतदारसंघातून उमेदवारी दिली आहे.

राजस्थानमधील लोकसभेच्या २५ पैकी १० जागांसाठी उमेदवार जाहीर केले आहेत. त्यात जालोरमधून वैभव गेहलोत, बिकानेरमधून गोविंद मेघवाल, चुरुमधून राहुल कासवा, झुंझुनूमधून बृजेंद्र ओला, अलवरमधून ललित यादव, भरतपूरमधून संजना जाटव, टोंकमधून हरीश मीना, जोधपूरमधून करणिंसग उचियाराडा, उदयपूरमधून ताराचंद मीना आणि चित्तौडमधून उदयलाल अंजाना यांना उमेदवारी दिली आहे.

मध्य प्रदेशातील ज्या १० जागांसाठी उमेदवार जाहीर करण्यात आले आहेत त्यामध्ये छिंदवाडामधून नकुलनाथ, भिंडमधून फूलसिंग बरैया, टिकमगडमधून पंकच अहिरवार, सतनामधून सिद्धार्थ कुशवाह, सिधीमधून कमलेश्वर पटेल, मंडलामधून ओंकार सिंग मरकाम, देवासमधून राजेंद्र मालवीय, धारमधून राधेश्याम मुवेल, खरगोनमधून पोरलाल खर्ते, बैतूलमधून रामू टेकाम यांना तिकीट मिळाले आहे. काँग्रेसने आसाममधील लोकसभेच्या १२ जागांसाठी आपले उमेदवार जाहीर केले आहेत.




कोक्राझारमधून गर्जन मश्रे, धुबरीतून रकीबुल हसन, बारपेटामधून दीप बयान, दारा उदलगुरीमधून माधब राजवंशी, गुवाहाटीमधून मीरा बोरठाकूर गोस्वामी, दिपूमधून जयराम आंगलोंग, करीमगंजमधून हाफिज रशीद अहम चौधरी, सुराज्यातून सिलसिलेवार, नागावमधून बोरदोलोई, काझीरंगातून रोसेलिना टिर्के, सोनितपूरमधून प्रेमलाल गंजू आणि जोरहाटमधून गौरव गोगोई यांना उमेदवारी जाहीर झाली आहे. उत्तराखंडमधील चार जागांवर काँग्रेसने आपले उमेदवार घोषित केले आहेत. टिहरी गढवालमधून जोतिंसग गुंटसोला, गढवालमधून गणेश गोदियाल आणि अल्मोडामधून प्रदीप टमटा यांचा समावेश आहे.

तर दमण आणि दीवमध्ये केतन दह्याभाई पटेल यांना तिकीट देण्यात आले आहे. काँग्रेसने जाहीर केलेल्या दुस–या यादीत गुजरातमधील २६ पैकी ७ जागांसाठी उमेदवार घोषित केले आहेत. पक्षाने कच्छमधून नितीश भाई लालन, बनस्कांठामधून गेनीबेन ठाकोर, अहमदाबाद पूर्वमधून रोहन गुप्ता, अहमदाबाद पश्चिममधून भरत मकवाना, पोरबंदरमधून ललित भाई वसोया, बारडोलीमधून सिद्धार्थ चौधरी, वलसाडमधून अनंत भाई पटेल यांना उमेदवारी दिली आहे. काँग्रेसने या यादीत ७ जनरल, १३ ओबीसी, १० एससी, ९ एसटी आणि एका मुस्लिम उमेदवाराला तिकीट दिले आहे.

## शिवणी व शिवणखेडमध्ये बिबट्या सदृश्य प्राणी; सतर्क राहण्याचे आवाहन

लातूर :– चाकूर ताल्युक्यातील शिवणी, शिवणखेडमध्ये बिबट्या सदृश्य प्राण्याचा वावर आढळून आला आहे. खबरदारीचा उपाय म्हणून याठिकाणी वन कर्मचारी तैनात करण्यात आले आहेत. तरी ग्रामस्थांनी सतर्क राहण्याचे आवाहन सहायक वनसंरक्षक वैशाली तांबे यांनी केले.

ग्रामस्थांनी शेतात रात्री मुक्काम करू नये. साथ सलोख्याचे नियम पाळून, चमूने, गटाने शेतकामास जावे. शेतात मोकळ्या जागेत मुक्काम करू नये, लहान मुलांना एकट्याने फिरू देऊ नये. जनावरांना बंदिस्त गोठ्यात अथवा निवाऱ्यात बांधावे. अफवांवर विश्वास ठेवू नये. बिबट्या सदृश्य प्राणी निदर्शनास आल्यास त्याची माहिती वन विभाग, सरपंच, पोलीस पाटील यांना कळवावे, असेही आवाहन त्यांनी केले आहे.

# जागतिक परिचारीका दिनानिमित्त शपथग्रहण सोहळा उत्साहात साजरा करण्यात आला.

लातूर :– जगभरात दरवर्षी १२ मे हा दिवस जागतिक परिचारिका दिन म्हणून मोठ्या प्रमाणात साजरा केला जातो. यानिमित्त ६ मे १२ हे याकाळात परिचारीका सप्ताह– विविध स्पर्धा व कार्यक्रमांचे आयोजन केले होते. महाराष्ट्र राज्य परिचारीका संघटना,शाखा लातूर संचलित – उत्सव समितीच्या वतीने करण्यात आले होते. रक्तदान शिबीर, कॅरम बॅडमिंटन, बुद्धिबळ, क्रिकेट महिला व पुरुषांसाठी, व्हॉलीबॉल, आनंद नगरी व सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. १२ मे रोजी या सप्ताहाची सांगता शपथग्रहण सोहळा व बक्षीस वितरण कार्यक्रमाने झाली. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे मुकबधीर शाळा लातूर येथील माजी मुख्याध्यापिका श्रीमती सुनिता कुलकर्णी या उपस्थित होत्या. तर अध्यक्षस्थानी विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाच्या अधिसेविका श्रीमती राजश्री हरंगुळे या होत्या. व्यासपीठावर अतिविशेषोपचार रुग्णालयाच्या मुख्य अधिसेविका श्रीमती अमृता पोहरे, सहाय्यक, अधिसेविका श्रीमती लक्ष्मी आपटे, महाराष्ट्र राज्य परिचारीका संघटना लातूर शाखेच्या अध्यक्ष श्रीमती छाया चव्हाण , उत्सव समितीच्या उपाध्यक्ष श्रीमती मीना दैवज्ञ, परिचर्या महाविद्यालयाच्या प्राचार्य अश्विनी बेले.इत्यादींची





उपस्थिती होती. परिचारिकांनी जागतिक परिचारीका दिनानिमित्त रुग्णसेवेची शपथ ग्रहण केली. तदनंतर विविध स्पर्धेतील विजेत्यांना पारितोषिके व सन्मानपत्र देण्यात आले. यावेळी वरिष्ठ परिसेविका श्रीमती शारदा खोब्रागडे यांचा त्यां करीत असलेल्या उत्कृष्ट कार्याचा गौरव म्हणून सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक राज्य सरचिटणीस सुमित्रा तोटे यांनी केले. तर सुत्रसंचलन रुपाली दिघे यांनी केले. दरवर्षी जागतिक परिचारीका दिनानिमित्त आंतरराष्ट्रीय परिचर्या परिषदेकडून घोषवाक्य दिले जाते. जीी छीीशी– जीी र्श्रीीश एलेपोळल ुशिी ष लरीश हे या वर्षीचे घोषवाक्य असून, जागतिक पातळीवर परिचारीकांवर मानसिक दबाव आहे.तसेच परिचारीकांचे मनुष्यबळ वाढविणे गरजेचे आहे तसेच यात गुंतवणूक होणे आवश्यक आहे. असे आंतरराष्ट्रीय तज्ञांचे मत आहे.असे श्रीमती सुमित्रा तोटे यांनी प्रास्ताविकात सांगितले. यावर कार्याध्यक्ष श्री दिपक सोळंके यांनी विस्तृत माहिती विशद केली. त्यानंतर उपस्थित मान्यवरांनीही मार्गदर्शन केले शेवटी महाराष्ट्र राज्य परिचारीका संघटना लातूर शाखेच्या अध्यक्ष श्रीमती छाया चव्हाण यांनी आभार व्यक्त केले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महाराष्ट्र राज्य परिचारीका संघटनेच्या राज्य सरचिटणीस श्रीमती सुमित्रा तोटे, शाखा लातूरच्या अध्यक्ष श्रीमती छाया चव्हाण, उपाध्यक्ष संजीव लहाने, रेणुका रेड्डी,संघटक पांडुरंग गव्हाणे,कार्याध्यक्ष दिपक सोळंके, सहखजिनदार दिपक शिंदे, विवेक वागलगावे, सहसचिव भगवान केंद्रे, सदस्य धनश्री गोसावी, उत्सव समिती उपाध्यक्ष श्रीमती मीना दैवज्ञ, विविध समिती प्रमुख श्रीमती शारदा खोब्रागडे, मीनाक्षी गोडबोले, श्रीमती शोभा जाधव, श्री योगेश वाघ, श्रीमती कल्पना गायकवाड, श्रीमती पुष्पा जावळे, श्री संतोष पाटील, श्रीमती अभिशक्ती पवार , जयश्री हेंडगे, आराधना क्षिरसागर, बिस्मिल्ला शेख, ज्योत्स्ना पेरके, रुपाली वाघमारे, श्री शुभम वानखेडे, सुधाकर केदार, अमित मलिशे, श्री प्रशांत मोराळे , शाम फड, इतर पदाधिकारी व सभासद यांनी परिश्रम घेतले.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE